Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 496 – 500
DOI: 10.5281/zenodo.10136699

Original Research Article

गांधीजींचे शिक्षणविषयक विचार : काल आणि आज

प्रा. डॉ. शिल्पा शेटे

श्री. पद्ममणि जैन कला व वाणिज्य महाविद्यालय, पाबळ ता. शिरूर, जि. पुणे ४१२४०३ महाराष्ट्र, भारत

Corresponding author E-mail: shilpasrujan@rediffmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

भारतात शिक्षण कशा पद्धतीचे असावे यावर ब्रिटीश काळापासून आत्तापर्यंत अनेक आयोग नेमले गेले. त्यांच्या शिफारशी अंमलात आणल्या गेल्या. विविध प्रयोग केले गेले, केले जात आहेत. अनेक विचारवंत व अभ्यासक यांनी आपापली मते यासंबंधी मांडली. याच व्यक्तिमत्वांपैकी एक थोर व्यक्तिमत्त्व म्हणजे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी होय. महात्मा गांधीजी यांनी भारतीय स्वातंत्र्यलढा चालू असल्यापासूनच सर्वच क्षेत्रात वेगळ्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न केला. याच प्रकारे त्यांनी शिक्षण व्यवस्थेसंबंधीही आपले विचार मांडले. ते केवळ विचार मांडूनच थांबले नाहीत तर त्यासंबंधी स्वत: कृती करून अंमलातही आणले. आणि त्यांचा एक रचनाबंध तयार केला. त्यांनी मांडलेले हे विचार डर्बन येथील आश्रम शाळेत तसेच वर्धा येथील शाळेत त्यांनी अंमलात आणलेले दिसतात. गांधीजींची शिक्षण योजना 'वर्धा योजना', किंवा 'मूलगामी शिक्षण' या नावाने ओळखली जाते. 'नयी तालीम' या नावानेही ती ओळखले जाते. त्यांनी व्यवहारिक शिक्षणावर, भर दिला. एखादा उद्योग, त्याची कौशल्ये, त्याचे शास्त्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा नई तालीमचा उद्देश होता. शिक्षण हे साध्य नसून ते एक साधन आहे असे गांधीजींचे मत होते. शिक्षण हे मानवी जीवनाची जडणघडण करण्याचे शास्त्र आहे, कलाही आहे. म्हणून शिक्षणातून व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास झाला पाहिजे.

गांधीजींचे शिक्षणविषयक विचार पाहता त्यात पुढील मुद्दे स्पष्टपणे जाणवतात.

१. शिक्षण मातृभाषेतूनच घ्यावे.
२. शिक्षणात अक्षरओळखीला गौण महत्त्व
३. अनुभवनिष्ठ शिक्षणावर भर
४. औद्योगिक शिक्षणाचे महत्त्व
५. चारित्र्य घडविणारे (हृदयाचे) शिक्षण
६. व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारे शिक्षण
७. मन, मेंदू, मनगट बळकट करणारे शिक्षण
८. अध्यात्मिक तसेच आत्मिक शिक्षणाला महत्त्व
९. कामाची प्रतिष्ठा निर्माण करणारे शिक्षण
१०. नैतिकता निर्माण करणारे शिक्षण
११. पर्यावरण पूरक शिक्षण

विद्यार्थ्यांना शिक्षण हे मुख्यत: मातृभाषेतूनच दिले पाहिजे, असे गांधीजींचे ठाम मत होते. इंग्रजीतून शिक्षण देणे हे गांधीजींना मान्य नव्हते. इंग्रजी ही जरी जगाची ज्ञानभाषा असली तरी, भारतातील उच्च शिक्षणात त्या भाषेला दुय्यम भाषेचे स्थान देऊन, त्या भाषेला कमीत

कमी महत्त्व द्यावे असे गांधीजींचे मत होते. सर्वांना आपली मातृभाषा तसेच हिंदी, संस्कृत, अरबी, फारसी या भाषा आल्या पाहिजेत. हिंदू असेल तर संस्कृत, मुसलमान असेल तर अरबी आणि पर्शियन/फारसी भाषा विद्यार्थ्यांना यायला हवी.[i] तसेच उत्तर भारतीय आणि पश्चिम भारतीयांनी तमिळ शिकायला हवी. संपूर्ण भारताची भाषा म्हणून सर्वांना हिंदी यायला हवी. आपल्या मातृभाषेतून शिक्षणाचे योग्य आकलन होऊ शकते असे गांधीजींचे म्हणणे होते. वर्तमानकालीन शिक्षण व्यवस्था ही इंग्रजीला खूप महत्त्व देत असल्यामुळे, शिक्षणाचे आकलन कमी होत आहे. गांधीजींनी स्वतःच्या मुलांना डर्बनमध्ये बरोबर नेले, तेव्हा गोऱ्या लोकांसाठी असणाऱ्या शाळांत त्यांनी आपल्या मुलांना पाठवले नाही. कारण तेथे हिंदी भाषेतून आणि मातृभाषेतून शिक्षण मिळणार नाही, असे त्यांना वाटत होते. गांधीजी मुलांशी बोलत असताना गुजराती भाषेतूनच बोलत असत. मुलांना दूर ठेवून शिक्षण देणे गांधीजींना मान्य नव्हते. सुव्यवस्थित पणे घरामध्ये जे शिक्षण मुलांना सहज मिळते,ते छात्रालयात मिळणे शक्य नाही असे त्यांचे मत होते.[ii]

इंग्रजी शिक्षण असे बोलताना गांधीजी म्हणतात, "मला जर न्याय मिळवण्यासाठी न्यायालयात जायचे असेल तर मला इंग्रजी भाषेच्या माध्यमातून बॅरिस्टर झालं की माझ्या मातृभाषेत बोलायचं नाही आणि दुसऱ्या कोणी मला माझ्याच भाषेत भाषांतर करून सांगितले पाहिजे."[iii] हे सारे गांधीजींना विलक्षण तापदायक आणि गुलामगिरीचे लक्षण वाटते.

पाठ्यपुस्तकातून दिलेले शिक्षण किंवा अक्षर ओळख या स्वरूपातील शिक्षण गांधीजींना फार महत्त्वाचे वाटत नव्हते. हे शिक्षण प्राथमिक पातळीवर देणे गरजेचे असले, तरी केवळ साक्षर होण्यातून शिक्षण होत नाही, असे गांधीजींना वाटते. अशा पद्धतीचे शिक्षण हे व्यक्तीला अपंग करते. याबाबतीत उदाहरण देत असताना गांधीजी म्हणतात, "एखादा शेतकरी प्रामाणिकपणे आपला उदरनिर्वाह करतो. त्याला जगाच्या व्यवहाराची सर्वसाधारण कल्पना असते. आपल्या आईवडिलांशी, बायकोशी, मुलाबाळांशी आणि गाववाल्यांशी कसे वागावे याची त्याला बऱ्यापैकी जाणीव असते. त्याला नीतिनियमाची समज असते आणि ते तो पाळतो. परंतु त्याला स्वतःचे नाव लिहिता येत नाही. त्याला अक्षरओळख शिकवून तुम्ही काय साधणार आहात? त्याच्या सुखा समाधानात त्यामुळे तसूभर फरक पडणार आहे का?"[iv] असा प्रश्न गांधीजी व्यक्त करतात.

कोणतेही शिक्षण हे अनुभवातून अधिक चांगल्या पद्धतीने देता येते. व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे करणे आणि त्याच्यात कौशल्यनिर्मिती, कामाविषयी सन्मान निर्माण करणे, त्याच्यासाठी कायम स्वरूपाचे कुटुंबनिर्वाहाचे साधन निर्माण करेल अशा पद्धतीचे शिक्षण दिले पाहिजे. उद्योग आणि समाजातील गरज यांच्याशी पाठ्यक्रमातील शिक्षण जोडले पाहिजे, असे त्यांना वाटते. गांधीजींनी स्वत: आपल्या घरात शिक्षण देत असताना काम करत करत शिक्षण देण्याला महत्त्व दिले होते हे दिसते. उदा. त्यांनी त्यांच्या घरामध्ये पयखाने, खोली साफ करणे, बैठक धुणे वगैरे कामे नोकराकडे न देता ते स्वतः आणि त्यांची मुले करत असत. त्याचप्रमाणे आपल्या फिनिक्स आश्रम शाळेतील दिनचर्येत विद्यार्थांकडून खड्डे खोदणे, वृक्ष लागवड करणे, स्वच्छता करणे यासारखी कार्ये करून घेत. अशा प्रकारे कृतीतून शिक्षण देत होते.[v]

व्यावसायिक शिक्षणावर गांधीजींचा अधिक भर होता. व्यवसायिक शिक्षण हे कोणत्याही विद्यार्थ्यांसाठी सर्वात महत्त्वाचा पर्याय आहे, अशी गांधीजींची प्रामाणिक भावना होती. व्यवसायिक शिक्षणाच्या माध्यमातून वेगवेगळ्या स्वरूपाचे उदा. कृषी क्षेत्रामध्ये असेल किंवा संशोधन क्षेत्रामध्ये असेल विविध स्वरूपातून विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक निर्भरता निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना हस्तशिल्प आणि कौशल्यावर आधारित शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यातूनच बेरोजगारी दूर होऊ शकेल असे त्यांना वाटते. भारताची अर्थव्यवस्था ही कृषी अर्थव्यवस्था होती त्यामुळे या अर्थव्यवस्थेला पुनर्जीवित करणे, वेगवेगळ्या प्रकारचे प्रयोग करून शेतीचे उत्पन्न वाढवणे आणि शेतीसंबंधी अधिकाधिक चांगल्या पद्धतीने शिक्षण देणे त्यांना महत्त्वाचे वाटते. विविध हिंदुस्तानी उद्योगांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. त्यामध्ये कापड उद्योग, चामड्याचे उद्योग, कंपोस्ट खत, चरखा चालवण्याचे प्रशिक्षण, दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू इत्यादी प्रकारचे प्रशिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना तयार केले गेले पाहिजे.[vi] तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीमध्ये तंत्रज्ञान, इंजीनियरिंग, औद्योगिक शिक्षण, वास्तुकला, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट यासारखे महत्त्वाचे शिक्षण दिले पाहिजे असे त्यांना वाटते. शिक्षण कुठल्या ना कुठल्या उद्योगासंदर्भात किंवा व्यवसायभिमुख दिले जावे, प्रत्यक्ष स्वावलंबी बनवणारे असावे.

शिक्षणामुळे बुद्धी, कृती आणि भावना यांचा समप्रमाणात विकास व्हावा, असे गांधीजींचे मत होते. गांधीजींच्या मते शिक्षणात पुढील गोष्टींचा समावेश हवा, मातृभाषा, अंकगणित, प्राकृतिक विज्ञान, समाजशास्त्र, भूगोल आणि इतिहास अंगमेहनत, तालीम किंवा कसरत, कला आणि संगीत, मूलभूत शिक्षण यालाही गांधीजींनी अत्यंत महत्त्व दिले होते. कोणत्याही मुलाला उद्योग शास्त्रीय आणि संस्कारी, नीतीमत्ता पद्धतीने शिकविणे या विचारांचा आग्रह पूर्वक समर्थन गांधीजी करत होते. या दृष्टिकोनातून व्यक्तीचा आणि राष्ट्राचा विकास होईल असे त्यांना वाटत होते. समाजाचा सर्वांगीण विकास झाला तरच सशक्त विकसित भारत साकार होईल, असे त्यांना वाटत होते.

शाळा आणि महाविद्यालये हीच चरित्र संवर्धनाची केंद्रे बंनली पाहिजेत,[vii] असा त्यांचा विचार होता. शिक्षण नैतिकता निर्माण करणारे असले पाहिजे. समाजातील भ्रष्टाचार, धार्मिक विद्वेष, स्वार्थ, चारित्र्याचे पतन इत्यादी समस्या शिक्षणामुळे दूर करता आल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे शिक्षणातून सामाजिक समता, कोणत्याही कामाविषयी सन्मान व ते करण्याची तयारी या भावना मनामध्ये निर्माण व्हाव्यात.

त्याचप्रमाणे शिक्षणाच्या माध्यमातून सांस्कृतिक विकास होणे गरजेचे आहे. शिक्षणातून श्रमप्रतिष्ठा, आत्मविकास, शांतता, सत्य, न्यायप्रियता, निर्माण होणे गरजेचे आहे.

शिक्षणाचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे व्यक्तीचे चारित्र्य निर्माण झाले पाहिजे. "जर शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीमध्ये चारित्र निर्माण झाले नाही तर, शिक्षणाचा उपयोगापेक्षा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ शकतो."[viii] असे गांधीजींनी म्हटले आहे. शिक्षणातून स्वतःचा आत्मिक विकास होणे हे गांधीजींना महत्त्वाचे वाटते. शिक्षण आरोग्यदायी असले पाहिजे, माणसाला त्यातून स्वास्थ्य निर्माण झाले पाहिजे. स्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी होमिओपथी किंवा आयुर्वेदिक शिक्षण गांधीजींना महत्त्वाचे वाटते. शिक्षणामध्ये व्यायामाला महत्त्व असले पाहिजे. भारतामध्ये विविध प्रकारची संस्कृती होती, आहे. तो संस्कृतिक वारसा पुढे नेणारे शिक्षण निर्माण झाले पाहिजे.

हृदयाच्या शिक्षणाला म्हणजे चारित्राच्या विकासाला गांधीजी नेहमीच प्राधान्य देत आले आहेत आणि चारित्र्याचे ज्ञान वाटेल त्या वयाच्या व वाटेल त्या वातावरणात वाढलेल्या मुलामुलींना, कमीजास्त प्रमाणात का होईना पण देण्याचा प्रयत्न करावा,[ix] असे ते म्हणतात. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशक्ती निर्माण करणारी अशा पद्धतीची शिक्षण व्यवस्था निर्माण झाली पाहिजे.

भारतात अतिप्राचीन कालखंडापासून शिक्षणाची एक व्यवस्था होती. भारतामध्ये तक्षशिला, नालंदा यांसारखी विद्यापीठे होती, जी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे शिक्षण देत होती. गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांना श्रमाचे मूल्य, स्वतःचे सर्व काम स्वतः करणे, शेती, पशुपालन, युद्ध करणे, विविध प्रकारची कारागिरी, स्वयंपाक, स्वच्छता या प्रकारचे सर्वांगीण शिक्षण दिले जात होते. याच पद्धतीचे शिक्षण वर्तमान काळातही दिले जाणे गरजेचे आहे, असे गांधीजींना वाटते. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून अध्यात्मिक, बौद्धिक, शारीरिक, मानसिक असा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे, गरजेचे आहे. समता, सहिष्णुता व सहकार्याची भावना निर्माण करणे गांधीजींना महत्त्वाचे वाटते.

शिक्षणाच्या माध्यमातून शरीर, मन आणि आत्म्याचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. स्त्री पुरुष किंवा इतर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना शिक्षण मिळणे हा प्रत्येक मानवाचा हक्क असेल. जोपर्यंत शिक्षणातून चांगले नागरिक, चांगला माणूस निर्माण होऊ शकत नाही, तोपर्यंत त्या शिक्षणाचा उपयोग नाही असे गांधीजींना वाटते. नैतिक आणि अध्यात्मिक विकास शिक्षणाच्या माध्यमातून व्हावा, लोकशाहीचा विकास व्हावा व ती अधिक मजबूत करणारे शिक्षण दिले जावे. शिक्षणाच्या माध्यमातून सहानुभूती, सेवा, बंधुभाव, समानता आणि स्वतंत्रता हे गुण निर्माण व्हावेत. सर्वोदय आणि अंत्योदय या दोन संकल्पना गांधीजींना महत्त्वाच्या वाटतात. ज्या शिक्षणाच्या माध्यमातून पूर्णत्वास जाव्यात असे गांधीजींना वाटते.

मन, मनगट आणि मेंदू यांचा विकास करणारे शिक्षण गांधीजींना अपेक्षित आहे, केवळ प्रचलित बौद्धिक शिक्षण प्रणालीमुळे समाजामध्ये फायद्यांपेक्षा दुष्परिणाम अधिक होऊ शकतील असे गांधीजींनी म्हटले होते व ते आज दिसत आहेत. सत्य अहिंसा आणि निष्ठा, मानवता यापासून दूर जात असलेले केवळ बौद्धिक विकास करणारी शिक्षण पद्धती आज उभी राहत आहे. मातृभाषेतून मिळालेल्या शिक्षणातून, झालेल्या अकलनातून कल्पकतेबरोबर विचार शक्तीला चालना मिळते. अधिक चांगल्या पद्धतीने सृजनशीलतेचा विकास होतो. शिक्षणातून माणसाच्या मनामध्ये आत्मनिर्भरता निर्माण झाली पाहिजे. लिहिणे वाचणे आणि अंकगणित याच्या पुढे गेल्यानंतर तुमचं हृदय, मन, मेंदू आणि मनगट यांचा विकास करणारे शिक्षण दिले पाहिजे.

गांधीजी म्हणतात,"असा माणूसच खरा शिकलेला असे मी मानतो की ज्याच्या शरीराला तरुण वयात असे वळण मिळाले आहे की ते त्याच्या इच्छाशक्ती नुसार वागते आणि शरीराच्या रचनेनुसार जे - जे काही शक्य आहे ते-ते सहजपणे आणि आनंदाने करते; ज्याची बुद्धिमत्ता ही सुस्पष्ट, तटस्थ आणि संयुक्तिक पद्धतीने चालणाऱ्या इंजिनाप्रमाणे आहे, ज्याचे सर्व भाग हे सारखेच सक्षम आहेत आणि सुरळीतपणे काम करू शकतात.....जो स्वत:प्रमाणे दुसऱ्यांचाही मान राखू शकतो..... तो निसर्गाचा आणि निसर्ग त्याचा चांगला उपयोग करून घेतो."[x]

अध्यात्मिक आणि धार्मिक शिक्षणाला अग्रस्थान द्यायला हवे. आत्मिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे असे महात्मा गांधीजींना वाटत होते. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या धर्माची मूलतत्त्वे माहिती असली पाहिजेत. आपापल्या धर्मग्रंथाचे सामान्य ज्ञान त्याला असले पाहिजे, असे त्यांना वाटत होते.[xi]

धार्मिक शिक्षणावर महात्मा गांधीजी जोर देतात. मात्र आपले धर्मगुरू हे दांभिक आणि स्वार्थी आहेत; त्यांना गाठवेच लागेल. मुल्ला, दस्तूर आणि ब्राह्मण यांच्याच हातात चावी आहे, पण त्यांना जर सद्बुद्धी झाली नाही, तर मग आपण इंग्रजी शिक्षणातून जी उर्जा प्राप्त केली, ती धार्मिक शिक्षणासाठी वेचावी लागेल. ते फारसे कठीण नाही.[xii] असे त्यांना वाटते.

श्रमप्रतिष्ठा, आत्मपरीक्षण, आत्मसन्मान, हातावरील विश्वास, उत्पादकता अशा अनेक शैक्षणिक तत्त्वांचा समावेश त्यांच्या शिक्षण व्यवस्थेत होता. खंडप्राय देशाची शेती ही शेतीप्रधानतेकडून उद्योग पूरक करणे, खड्डे खोदणे, वृक्षारोपण, पेरणी, पिक संरक्षण, उत्पन्न, नैतिकता, विद्यार्थी हा पुस्तकांपेक्षा शिक्षकाच्या जीवनातून जास्त शिक्षण घेतो, म्हणून शिक्षक हा अगोदर चारित्र्यसंपन्न, गुणवंत, प्रामाणिक असला पाहिजे. गांधीजींच्या मते आत्मसन्मान यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे.[xiii]

पर्यावरण पूरक शिक्षणाला गांधीजी महत्त्व देतात. साधन संपत्तीचा विवेकाने गरजेपुरता वापर केला तर साधन संपत्ती दीर्घकाळ पुढील पिढ्या व अधिक लोकांना वापरण्यास मिळेल. भविष्यकालीन पिढ्यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठीतारेवरची कसरत करावी लागणार नाही. न्याय्य बुद्धीचा वापर, नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर, पर्यावरण संरक्षण, प्रदूषके करणाऱ्यांकडून भरपाई घेणे, समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करणे, गरिबीचे निर्मूलन ही शाश्वत विकासाची तत्वे आहेत. विद्यार्थी शाळेच्या वस्तू तयार करतील किंवा जे उत्पादन करतील ते विकणे व त्यातून मुख्यतः शिक्षकांचे वेतन, शाळेचे इतर खर्च भागविणे, याला स्वावलंबी शिक्षण असे म्हटले जाते. पर्यावरणीय, शाश्वत विकासात नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर, जैवविविधतेचे संरक्षण, कचऱ्याचे व्यवस्थापन, स्वच्छता, परिसंस्था संरक्षण व संवर्धन यांचा समावेश शिक्षणात असावा. त्या त्या प्रदेशातील प्राकृतिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवन ही समन्वयाची केंद्र असावीत.

आपले शैक्षणिक विचार अमलात आणण्यासाठी गांधीजींनी विविध शैक्षणिक प्रयोग केले. १९०४ साली गांधीजींनी फिनिक्स समाज स्थापन केला. पुढे गुरुकुल पद्धतीने आश्रम शाळा सुरू झाली १९११ औद्योगिक शिक्षणाबरोबर वांङ्मयीन शिक्षणाकडे लक्ष देण्यात आले. वर्धा शिक्षण योजना राबविली गांधीजींनी आपल्या शिक्षण पद्धतीला 'नई तालीम' हे नाव दिले. यात ७ ते १४ वयापर्यंतच्या सर्वांना सक्तीचे व मोफत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण असावे,[xiv] असे गांधीजींचे मत होते.

१९४० साली शेगावचे सेवाग्रामचे नामकरण करण्यात आले. इथूनच 'वर्धा शिक्षण योजना' सुरू झालेली दिसते.[xv] गांधीजींना अत्याधुनिक शिक्षण सक्तीचे करणे आवश्यक वाटत नाही. त्यांच्या मते त्यांची जुनी शिक्षण पद्धती पुरेशा आहेत आणि असेच प्राथमिक शिक्षण असावे. इंग्रजी शिक्षणाची गरज गांधीजींना आवश्यक वाटत असली तरी ती अपरिहार्य किंवा त्याला प्राधान्य द्यावे असे त्यांना वाटत नाही. कोट्यावधी लोकांनी इंग्रजी शिक्षण घेणे गरजेचे नाही, असे गांधीजींना वाटते इंग्रजी शिक्षणामुळे भारतीय लोक गुलाम बनले असे त्यांना वाटते.[xvi]

आपण इंग्रजी शिक्षण पद्धतीने इतके पछाडले होतो की इंग्रजी शिक्षणाशिवाय राहणे आपल्याला अजिबात जमणार नाही असे लोकांना वाटते. जे लोक इंग्रजी शिकलेले असतील त्यांनी आपल्या मुलाबाळांना नीती मुल्ये आपापल्या मातृभाषेतून शिकवावित आणि त्यांना अन्य भारतीय भाषा शिकवावी. त्यांनी मोठे झाल्यानंतर इंग्रजी भाषा शिकण्यास हरकत नाही, परंतु अंतिम उद्देश इंग्रजी भाषा हीच त्यांची गरज भासू नये. जी इंग्रजी भाषेत मौल्यवान पुस्तके आहेत, त्यांचा अनुवाद भारतीय भाषेत करायला हवा.

शिक्षण हे फक्त अक्षर ज्ञानापुरते मर्यादित असता कामा नाही तर त्यातून सेवावृत्ती सुद्धा निर्माण झाली पाहिजे, असे गांधीजी मानत. गांधीजींनी त्यांच्या आत्मकथेमध्ये जेव्हा ते सर्वात पहिल्यांदा काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये गेले होते तेव्हाची आठवण त्यांनी सांगितली आहे. त्यानुसार तेथे असणाऱ्या विविध लोकांमध्ये असणारी विषमता, कार्यकर्ते व पुढारी यांच्या वेगवेगळ्या चुली, हे पाहून त्यांना वाईट वाटले. त्याशिवाय तिथले पयखाने अत्यंत दुर्गंधी होते. ते स्वच्छ करण्यास स्वयंसेवक नकार देत. तेव्हा त्यांनी स्वतःच ते स्वच्छ केले. हे त्यांच्या स्वयंशिस्तीचे आणि स्वच्छतेचे उदाहरण आहे.[xvii]

शिक्षण म्हणजे शील बनविणे, ईश्वराचे ज्ञान मिळविणे, आत्मज्ञान प्राप्त करून घेणे[xviii] बालकांना मार देऊन त्यांना शिकवण्याची पद्धती गांधीजींना कधीच पसंत पडली नाही. तसेच शिक्षण सक्तीने देणे हेही त्यांना पसंत नव्हते.[xix]

महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार हे वर्तमान काळातही महत्त्वाचे वाटतात. कारण वर्तमान काळातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, शारीरिक कष्ट करण्याची वाटणारी लाज, पर्यावर्णाचा होणारा प्रचंड ऱ्हास, ढासळत चाललेली नितीमत्ता, भष्टाचार, सहानुभूतीचा अभाव, निर्ढावलेली मने, शिक्षण आणि व्यावसाय यांचा तसूभरही नसलेला संबंध, घोकंपट्टीला महत्त्व, जिवघेणी वाढलेली स्पर्धा, हवे ते इप्सित साध्य झाले नाही तर अपयश पचवण्याची संपलेली क्षमता, त्यातून विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे फुटलेले पेव यासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ज्या आजच्या शिक्षणाच्या मर्यादा स्पष्ट करतात. अशा वेळी म. गांधीजींची शिक्षण प्रणाली महत्त्वाची वाटते. त्यात काही त्रुटी असतीलही उदा. यांत्रीकीकरण किंवा मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीरण गांधीजींना मान्य नव्हते. यातून भारतात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी व चंगळवाद वाढेल ही भीती गांधीजींना वाटत होती. मात्र यांत्रिकीकरणाला आधुनिक काळात पर्याय नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. मात्र यांत्रिकीकरणासारख्या गोष्टी अपरिहार्य असल्या, तरी मानवाचे मनही यांत्रिक होत चालले आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

२०२० मध्ये नवीन शिक्षण धोरण शासनाने लागू केलेले आहे. या शासकीय धोरणामध्ये प्रचलित बौद्धिक शिक्षण प्रणालीऐवजी व्यावसायिक शिक्षणावर भर दिलेला आपल्याला पाहायला मिळतो. त्यामधून बेरोजगारी कमी होऊन वेगवेगळे व्यवसायिक किंवा कौशल्य विकास आधारित शिक्षण निर्माण होईल अशी आशा वाटते. शिक्षणात केवळ विज्ञान, तंत्रज्ञान यावरच भर न देता, सामाजिक शास्त्रे, आपल्या देशाची वैभवशाली ऐतिहासिक परंपरा, विविध प्रादेशिक भाषा, श्रमप्रतिष्ठा यांना महत्त्व या सारख्या संकल्पना या धोरणात मांडलेल्या आहेत. ज्या गांधीजींच्या शिक्षण पद्धतीस महत्त्व देताना दिसतात. अर्थात त्याची अंमलबजावणी कशी होते, त्यावर या नवीन शैक्षणिक धोरणाचे यश-अपयश अवलंबून असणार आहे. मात्र गांधीजींचे विचार त्यातील काही त्रुटी बाजूला सारून अंमलात आणले तर ते राष्ट्रासाठी अधिक उपयुक्त ठरेल असे निश्चितच वाटते.

[i] मोहनदास करमचंद गांधी, (अनु. रामदास भटकळ), *इंडियन होम रूल हिंद स्वराज,* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१७, पुनर्मुद्रण, २०१९. पृ.७९.
[ii] मो. क. गांधी, *सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,* नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, फेब्रुवारी १९९७, पृ. १८९.
[iii] पूर्वोक्त, इंडियन होम रूल हिंद स्वराज, पृ. ७८.
[iv] कित्ता, पृ. ७५.
[v] पूर्वोक्त, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,पृ. २९६.
[vi] संपा. रमेश ओझा, *गांधी : खुर्द आणि बुद्रुक,* साधना प्रकाशन, पुणे, जानेवारी २०२२, पृ. १२७.
[vii] अनु. शोभा भागवत, *बहुरूप गांधी,* कजा कजा मरू प्रकाशन, पुणे २००४. पृ. ५९.
[viii] पूर्वोक्त, इंडियन होम रूल हिंद स्वराज, पृ. ७४.
[ix] पूर्वोक्त, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,पृ. ३१९.
[x] पूर्वोक्त, इंडियन होम रूल हिंद स्वराज, पृ. ७५.
[xi] पूर्वोक्त, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,पृ. ३२३.
[xii] पूर्वोक्त, इंडियन होम रूल हिंद स्वराज, पृ. ७९.
[xiii] पूर्वोक्त, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,पृ. ३२४
[xiv] पूर्वोक्त, गांधी : खुर्द आणि बुद्रुक, पृ. १२५.
[xv] पूर्वोक्त, इंडियन होम रूल हिंद स्वराज, पृ. ७६.
[xvi] किता, पृ. ७७.
[xvii] पूर्वोक्त, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, पृ. २१३.
[xviii] कित्ता, पृ. ३२३.
[xix] कित्ता, पृ. ३२५.

संदर्भ ग्रंथ सूची

१) संपा. ओझा रमेश, *गांधी : खुर्द आणि बुद्रुक,* साधना प्रकाशन, पुणे, जानेवारी २०२२,
२) गांधी मोहनदास करमचंद, (अनु. रामदास भटकळ), *इंडियन होम रूल हिंद स्वराज,* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१७, पुनर्मुद्रण, २०१९.
३) गांधी मो. क., *सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा,* नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, फेब्रुवारी १९९७,
४) अनु. भागवत शोभा, *बहुरूप गांधी,* कजा कजा मरू प्रकाशन, पुणे, २००४.